एकलव्य

# उंदराला सापडली पेन्सिल

एक चित्रकथा



वी. सुतेयेव

# उंदराला सापडली पेन्सिल

चित्र आणि कथा
वी. सुतेयेव

एकलव्य चे प्रकाशन

**उंदराला सापडली पेंसिल**

एक चित्रकथा
चित्र आणि कथाः वी. सुतेयेव
अनुवादः माधव केलकर
स्टोरीज़ एंड पिक्चर्स ची एक चित्रकथा
प्रगति प्रकाशन, मास्को च्या सौजन्य ने इंग्रेजीतून अनुवादीत आणि प्रकाशित।

ही चित्रकथा संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार
आणि सर रतन टाटा ट्रस्ट च्या सहयोगानी विकसित।

संस्करणः डिसेम्बर 2000 / 2000 प्रति
पहला पुनर्मुद्रणः एप्रिल 2007 / 3000 प्रति
दूसरा पुनर्मुद्रणः जुळै 2015 / 2500 प्रति
तीसरा पुनर्मुद्रणः ऑक्टोबर 2015 / 2000 प्रति
चौथा पुनर्मुद्रणः जानेवारी 2020 / 2000 प्रति
पाँचवाँ पुनर्मुद्रणः जानेवारी 2022 / 2000 प्रति
कागज़ः 100 gsm मेपलिथो व 210 gsm पेपर बोर्ड कवर
ISBN: 978-81-87171-95-9
मूल्यः ₹ 45.00

ही चित्रकथा इंग्रेज़ी आणि हिन्दीत पण उपलब्ध आहे।


प्रकाशकः **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर
फॉर्च्यून कस्तूरी के पास, जाटखेड़ी,
भोपाल - 462 026 (मप्र)
फोनः +91 755 - 297 7770, 71, 72, 73
www.eklavya.in / books@eklavya.in

मुद्रकः आर के सिक्युप्रिंट प्रा लि, भोपाल फोनः +91 755 2687 589






# उंदराला सापडली पेन्सिल



एकदा एका उंदराला भूक लागली. तो खायला काही तरी शोधू लागला. त्याला एक पेन्सिल सापडली.







उंदीर ती पेन्सिल घेऊन बिळात शिरला.
“मला सोड, मला जाऊ दे” ती पेन्सिल गयावया करु लागली.
मी म्हणजे नुसता एक लाकडाचा तुकडा. काही चवसुद्धा नाही.
“मला खाऊन तुला काय मिळणार?” पेन्सिल म्हणाली.




“मी तुला कुरतडीन. मला माझे दांत पक्के आणि धारदार ठेवण्यासाठी नेहमीच काही न काही कुरतडणे भाग आहे.” असे सांगून उंदीर पेन्सिल कुरतडू लागला.




“अरे!.. दुखतं रे पेन्सिल
रडू लागली. बरं निदान मला
एक शेवटचं
चित्र तरी काढू दे.
मग वाटेल
ते कर.” पेन्सिल
विनवणी करु
लागली.






“बरं ठीक आहे. तू एक चित्र काढ. मग मी तुझे तुकडे तुकडे करीन.” उंदीर म्हणाला.






पेन्सिलीच्या जिवात जीव आला. ती चीत्र काढू लागली. तिनं एक मोठा गोल काढला. “हे पनीर आहे का?” उंदराने लगेच विचारलं.





“हो आपण याला पनीर म्हणू.” पेन्सिल म्हणाली. नंतर तिनं त्या मोठ्या वर्तुळाच्या आत तीन छोटी वर्तुळं काढली.


“आहा.. याला
पनीर सारखी
भोकं पण
आहेत.”
उंदराला अगदी
आनंद झाला.



“हो. ही पनीर ची भोकंच आहेत.” असं म्हणून पेन्सिलनं मोठ्या गोलाखाली आणखी मोठा गोल काढला.




“अरे! हे काय?
हे तर सफरचंद
आहे.” उंदीर
खुशीत म्हणाला.




पेन्सिल म्हणाली “हो याला आपण सफरचंद म्हणू या.” मग ती मोठ्या गोलाजवळ काही विचित्र आकृत्या काढू लागली.

“अरे वा! काय गंमत आहे.
हे तर चमचम आहे.”
उंदराच्या तोंडाला पाणी सुटू
लागले. तो थोड्या आतुरतेने
म्हणाला.


“लवकर पूर्णकर आपलं
चित्र. मला फार भूक
लागली आहे.”



पेन्सिलीने निमूटपणे वरच्या गोलावर दोन छोटे त्रिकोण काढले.



“हे... हे काय! अरे ही तर तू मांजर काढते आहेस. पूरे आता नको काढू.” उंदीर ओरडला.




आरडाओरड्या कडे लक्ष न देता पेन्सिल चित्र पूर्ण करु लागली. तिने मिश्या आणि तोंड काढलं.

आता उंदीर घाबरुन गेला. “अरे बाप रे! हा तर खरोखरचा बोका वाटतो. वाचवा हो वाचवा.”



असे ओरडत उंदीर आपल्या बिळात शिरला.



मित्रांनो तुम्ही एक असा बोका काढू शकाल का ज्याला पाहून उंदीर घाबरून पळून जाईल.

एकलव्य चे प्रकाशन

मूल्य: ₹ 45.00

9788187171959